# प्रसिद्धी विभाग २०१९ – २०

## मराठी विभाग

सकाळ

# राजगुरुनगरला 'प्रकाशक आपल्या भेटीला'

**राजगुरुनगर, ता. ११ :** "सध्या समाजमाध्यमांमुळे वाचनाचा वेळ मोठ्या प्रमाणात विभागला गेला आहे. त्यामुळे पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करून त्यांना प्रेरणादायी पुस्तकांची ओळख करून देण्याची गरज आहे," असे प्रतिपादन अक्षर वाङ्मय प्रकाशनाचे बाळासाहेब घोंगडे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळातर्फे आयोजित 'प्रकाशक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी बोलत होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. साईनाथ पाचारणे, प्रा. पायल ओसवाल उपस्थित होते. मराठी विभागातर्फे सुमारे १५० विद्यार्थ्यांना अल्प किमतीत पुस्तके भेट देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.



**राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांना अल्प किमतीत पुस्तके भेट देताना मान्यवर.**

Pune, District-Today
12/08/2019 Page No. 4

# ज्ञानाच्या अक्षर पेरणीसाठी प्रयत्नशील - घोंगडे

राजगुरुनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - समाजामध्ये वैचारिक परिवर्तनासाठी प्रकाशन व्यवसायात आलो असून दर्जेदार पुस्तके अधिकाधिक वाचकांपर्यंत पोचवून त्यांच्यात ज्ञानाची अक्षरपेरणी करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन अक्षर वाङ:मय प्रकाशनाचे बाळासाहेब घोंगडे यांनी केले.



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पुस्तक भेट उपक्रम राबविण्यात आला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ:मय मंडळाच्या वतीने आयोजित प्रकाशक आपल्या भेटीला, या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना घोंगडे बोलत होते. यावेळी १५० विद्यार्थ्यांना अल्प किमतीत पुस्तके भेट देण्यात आली. घोंगडे म्हणाले की, कोणतीही पार्श्वभूमी नसताना केवळ वाचनाच्या आवडीमुळे प्रकाशन व्यवसायात आलो आहे. प्रकाशक या नात्याने पुस्तक निर्मितीची प्रक्रिया उलगडून दाखवताना त्यांनी प्रकाशक, लेखक, संपादक, मुद्रितशोधक, डिझायनिंग, चित्र, छायाचित्रण, कागद, किंमत, विपणन आदि विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

ते म्हणाले की, समाजमाध्यमांमुळे वाचनाचा वेळ मोठ्या प्रमाणात विभागला गेला आहे. त्यामुळे महाविद्यालयात पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांमध्ये इतर अवांतर वाचनाची गोडी निर्माण करून त्यांना प्रेरणादायी पुस्तकांची ओळख करून देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. एच. एम.जरे यांनी पुस्तके भेट उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, मराठी वाङ:मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. साईनाथ पाचारणे, प्रा. पायल ओसवाल उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

प्रभात Mon, 12 August 2019
epaper.eprabhat.net/c/42394901

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख